**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही**
2. **ईस्टरचा सण सर्वत्र भक्तिभावानं साजरा**
3. **नागपूरमध्ये १७ वर्षांखालील सातव्या राष्ट्रीय कनिष्ठ गट मुष्टियुद्ध स्पर्धेला आजपासून सुरुवात**

**आणि**

4. **महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची बिनविरोध निवड**

**आता सविस्तर बातम्या …….**

**मुख्यमंत्री**

राज्यात गेल्या आठवड्यात अनेक भागात अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे पीकांचं नुकसान झालं आहे. नियमानुसार या शेतकऱ्यांना शासनाकडून आवश्यक ती भरपाई देण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नाशिकमध्ये दिली. नाशिकमध्ये अखिल भारतीय संत संमेलनाच्या कार्य समितीच्या बैठकीनंतर माध्यमांशी ते बोलत होते. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यानंतर पंचनामा केला जातो आणि त्यानंतर भरपाई दिली जाते ही पारंपारीक पध्दत अवलंबण्यात येते शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही असं मुख्यमंत्री म्हणाले. दरम्यान, नाशिकमधील भोंदू अशोक खरात याच्या अन्य कारभारांची वेगाने चौकशी सुरू आहे. विशेष चौकशी पथकाकडे यासंदर्भात अनेक प्रकारची माहिती मिळाली आहे. त्या आधारे बनावट खात्यांव्दारे झालेल्या उलाढालीची सक्त वसुली संचनालनलयाच्या वतीने तपासणी करण्यात येईल असही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या प्रकरणात कोणीही राजकारण करू नये असं आवाहन त्यांनी केलं.

**हरदीप पुरी**

भारत इराणसह इतर चाळीस देशांमधून कच्च्या तेलाची आयात करत असून या खरेदीच्या रकमा अदा करण्यात कसलीही समस्या नसल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी म्हटलं आहे. या प्रकारची समस्या निर्माण झाल्यानं भारताच्या वाडीनार इथं येणारं इराणी कच्च्या तेलाचं एक जहाज चीनकडे वळवण्यात

आल्याचं वृत्त समाजमाध्यमावर प्रसिद्ध झालं होतं. हे वृत्त चुकीचं असल्याची स्पष्टोक्ती पुरी यांनी दिली असून पश्चिम आशियामधल्या युद्ध स्थितीतही भारतीय तेलशुद्धीकरण प्रकल्पांना लागणाऱ्या कच्च्या तेलाचा पुरवठा विविध देशांमधून सुरळीतपणे होत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**पश्चिम आशिया युद्ध**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ४८ तासांचा अंतिम इशारा दिला आहे. इराणकडे यासाठी आता केवळ ४८ तासांचा अवधी असून त्यानंतर त्यांना गंभीर परिणामांना तोंड द्यावं लागेल, असं ट्रंप यांनी समाजमाध्यमावर एका संदेशात म्हटलं आहे. मात्र संघर्ष समाप्त करण्याचा अमेरिकेचा प्रस्ताव एकतर्फी असल्याचं सांगत इराणनं त्याला नकार दिला आहे.दरम्यान, इराणने पाडलेल्या अमेरिकेच्या एफ - १५ या विमानातल्या कर्मचाऱ्यांची यशस्वीपणे सुटका केल्याचा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा इराणनं फेटाळला आहे. जनतेत संभ्रम पसरवण्यासाठी ट्रम्प अशी विधानं करत असल्याचं इराणनं म्हटलं आहे.

**ईस्टर**

जगभरात आज ईस्टरचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. वेटिकन सिटीमध्ये पोप लिओ चौदावे यांनी काल बेसिलिकामध्ये ईस्टर प्रार्थना केल्यानंतर जगभरात ईस्टर सणाला सुरुवात झाली. पोप यांनी जागतिक पातळीवरच्या अशांततेच्या वातावरणात शांततेसाठी आणि बंधुत्वासाठी प्रार्थना केली. प्रभू येशू ख्रिस्ताला सुळावर चढवल्यानंतर त्यांचं याच दिवशी पुनरुथ्थान झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ हा सण साजरा केला जातो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी देशवासीयांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस सत्य, त्याग आणि प्रेमाचा संदेश देणारा आहे असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ख्रिस्ती धर्मियांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण प्रत्येकाच्या जीवनात आनंद, उत्साह आणि आशा निर्माण करो, असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. राज्यातल्या विविध चर्चेसमधे आज विशेष प्रार्थना आणि प्रवचनांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**सखोल पुनर्निरीक्षण**

एसआयआर विशेष सखोल पुनर्निरीक्षण अंतर्गत राज्यात मतदारयादीचा कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. याची पूर्वतयारी म्हणून सध्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी बीएलओ प्रत्येक मतदाराच्या नावाची २००२ च्या मतदारयादीशी जुळवणी करीत आहेत तसंच मतदारयादीतील अस्पष्ट फोटो, चुकीचे तपशील याची सुद्धा दुरुस्ती करत

आहेत. ज्या मतदारांचं स्वतःचं नाव २००२ च्या मतदारयादीत नव्हते, त्यांचे वडील किंवा आई यांची नावं त्या यादीत सापडणं आवश्यक आहे. सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमादरम्यान संपूर्ण मतदारयादी नव्यानं बनविली जाणार आहे. त्यासाठी प्रत्येक मतदाराकडून मतदारयादी माहिती अर्ज भरून घेतला जाणार आहे.

**अमरावती ग्रामपंचायत**

अमरावती जिल्ह्यात ग्रामपंचायतींमधील रिक्त जागांसाठी होत असलेल्या पोटनिवडणुकीची रणधुमाळी रंगात आली आहे. या जागांसाठी २८ एप्रिलला मतदान होणार असून सात एप्रिलपासून नामांकनास सुरुवात होत आहे. जिल्ह्यातील ६९ ग्रामपंचायतींमधील ९८ सदस्य आणि ११ सरपंच पदांसाठी ही निवडणूक होत आहे.

**राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धा**

महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीनं १७ वर्षांखालील सातव्या राष्ट्रीय कनिष्ठ गट मुष्टियुद्ध स्पर्धेचं आयोजन नागपूरच्या सिव्हिल लाइन्स इथल्या आमदार निवासस्थानी आज दिनांक ५ ते येत्या ११ एप्रिल दरम्यान करण्यात आलं असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज स्पर्धेचं उद्घाटन करण्यात आलं. महाराष्ट्राच्या क्रीडा इतिहासात महत्त्वाची भर घालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातून सुमारे ६०० मुष्टियोद्धे सहभागी होत आहेत. यामध्ये सुमारे २५० मुली आणि ३५० मुलांचा समावेश असून, त्यांच्यासोबत १८० प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक आणि ७० अधिकृत अधिकारी उपस्थित राहणार आहेत. ही स्पर्धा एकूण १३ वजन गटांमध्ये खेळवली जाणार आहे. सामने दररोज दुपारी २ वाजल्यापासून सुरू होतील. नागपूरची मुष्टियोद्धा समीक्षा सिंग ही शहराचं प्रतिनिधित्व करणार असून, अकोला, संभाजीनगर, पुणे, मुंबई आणि जळगाव इथले खेळाडूही या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची भारतीय १७ वर्षांखालील संघात निवड होऊन ते २०२६ मध्ये उझबेकिस्तानमधील ताश्कंद इथं होणाऱ्या आशियाई बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत देशाचं प्रतिनिधित्व करतील.

**मंत्री चंद्रकांत पाटील**

क्रीडाक्षेत्र हा करिअरचा सक्षम पर्याय म्हणून समोर येत असून महाराष्ट्र शासनाच्या सकारात्मक आणि कृतिशील धोरणामुळे राज्यातील क्रीडापटूंना स्थैर्य आणि सन्मान प्राप्त होत आहे. विविध क्रीडाप्रकारांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या ३७२ खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये विनापरीक्षा थेट सामावून घेण्यात आलं आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज सांगली इथं केलं. भारतीय विद्यापीठ महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमानं आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धांचं उद्घाटन

पाटील यांच्या हस्ते आज वसंत पाटील स्मृती स्मारक, कृष्णा नदीवरील रॉयल बोट क्लब इथं झालं, त्यावेळी ते बोलत होते.या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष आणि महिला खेळाडू सहभागी झाले आहेत.

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची आज बिनविरोध निवड झाली. बालेवाडी इथल्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्यानं निवडणूक बिनविरोध झाली. खो-खो संघटनेत अनेक वर्षांनी हा सन्मान एका महिलेला मिळाला आहे.

**टी २७ वाघीण**

नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया अंतर्गत वनपरिक्षेत्र पिटेझरी मध्ये जखमी T-27 वाघिणीचं अस्तित्व असून वाघिणीला जेरबंद करण्याचे प्रयत्न वन विभागाकडून युद्धस्तरावर सुरू आहेत. त्याच बरोबर वाघिणीचे अस्तित्व असलेल्या उमरझरी, आतेगाव, घानोड, शिवणटोला,आमगाव, खैरी, बांपेवाडा या गावात दररोज 24 तास STPF युनिट आणि स्थानिक वन विभागाचे कर्मचारी यांच्याकडून जनजागृती करण्यात येत आहे.

**पॅरा जागतिक तिरंदाजी**

बँकॉक इथं सुरू असलेल्या पॅरा जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारताची दिव्यांग तिरंदाज पायल नाग हिनं भारताच्याच दिव्यांग तिरंदाज शितल देवी हिचा पराभव करत सुवर्णपदक पटकावलं. या स्पर्धेच्या माध्यमातून भारतीय तिरंदाजांचं श्रेष्ठत्व पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे. भारताला सर्वाधिक ७ सुवर्ण पदक मिळाली आहेत

**हवामान**

संपूर्ण पूर्व विदर्भात आज विजांच्या कडकडाटासह वादळाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या देखील हीच परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, आज नागपुरात ३३ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल आणि २० पूर्णांक पाच दशांश अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं आहे.

**आयपीएल**

आयपीएल मध्ये आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. बेंगळुरू इथे एम. चिन्नास्वामी मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल

**गोट प्रोड्युसर कंपनी**

अमरावती जिल्ह्यात महिलांच्या उन्नतीसाठी 'गोट प्रोड्युसर कंपनी'मार्फत एक पथदर्शी प्रकल्प  राबवला जाणार आहे. राज्य शासनाच्या कृषी आणि पशुपालन विभागाने जिल्ह्याची भौगोलिक रचना आणि परंपरागत शेती व्यवसाय लक्षात घेता, इथं बकरीपालनाला मोठा वाव असल्याचं  निरीक्षण नोंदवलं आहे. या प्रकल्पाचे मुख्य उद्‌दिष्ट महिलांना सक्षम करणे हे आहे.

**NCC**

NCC अर्थात राष्ट्रीय कॅडेट कोर अधिकारी प्रशिक्षण अकादमी, कामठी, येथील चुन्नीलाल परेड मैदानावर एक भव्य परेड पार पडली. या परेडमध्ये राष्ट्रीय कॅडेट कोरच्या सीनियर डिव्हिजनमधील कॅडेट प्रशिक्षण अधिकाऱ्यांचा पासिंग आउट समारंभ झाला. या परेडमध्ये NCC च्या १७ संचालनालयांतील ८६ थर्ड ऑफिसर, ३८८ सेना कॅडेट प्रशिक्षण अधिकारी आणि ३९ नौसेना कॅडेट प्रशिक्षण अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. तसेच, गार्ड्स रेजिमेंटल सेंटर, कामठी येथील मिलिटरी बँडच्या मार्शल धूनांवर त्यांनी उत्कृष्ट पद्‌धतीने मार्चिंग सादर केलं.

******